# गळ्याची शपथ घे, अन् सांग मला..

(चाल-- ये वादा करो, चांदके सामने.)

व्हेलरी -- गळ्याची शपथ घे, अन् सांग मला
कधी ना कुणा, जाशी भुलवायला
हिल्टन--- हे माझे वचन, ह्यापुढे ग तुला
मिठी नाही दूस-या, कूणा बाईला



व्हेलरी --- आता ना कधी, लफडे करायचे
आता ना कधी, लटके बोलायचे
बाई छान दिसली, कितीही तरी
तिला प्रेमजाळी, न पकडायचे
परत नाही जमणार, आता मला
तुझ्यासाठी खोटे रे, बोलायला
गळ्याची शपथ घे...

हिल्टन--- आता पार्टीत टॅन्गो, मी ना करीन
पुन्हा सॅक्सोफोन, हाती ना धरीन
नाही कधी नाचीन, सेक्सी हसल्
तू पाहशील माझ्या, मनाचा बदल
जाऊ रविवारी रोज, आपण चर्चला
गाऊ तेथे गॉस्पेल , मग नाचायला
हे माझे वचन..........

व्हेलरी ---- गळ्याची शपथ घे...
हिल्टन --- हे माझे वचन ...

सुहास पै